तळेगाव दाभाडे नगरपरिषद

ता.मावळ जि.पुणे-४१२१०६

(उपविधी क्र. १३.१)

(एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील नियम क्र. २.११ नुसार)

भागशः भोगवटा प्रमाणपत्र (PART OCCUPANCY CERTIFICATE)

तळेगाव दाभाडे नगरपरिषद हद्दीतील स.नं. ३९३/ब (जुना स.नं. ३९३/१, ३९३/२ प्लॉट क्र. बी) या जागेतील मूळ बांधकाम परवानगी ननि/बाप/कावि/१९७७/१७ दि. २९/०४/२०१७ व सुधारीत बांधकाम परवानगी क्र. नर/बाप/२५८१/१९ दि. २४/०५/२०१९ अन्वये नाईकनवरे बिल्डकॉन प्रा.लि.तर्फे संचालक श्री.हेमंत दत्ताजी नाईकनवरे १२०४/०४, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-४११००४ यांना परवानगी देण्यात आली आहे. तसेच जोता तपासणी दाखला जा.क्र. ४२५७/१८ दि. १९/०७/२०१८ या इमारतीस जोता तपासणी प्रमाणपत्र दिलेले आहे. अर्जदार यांनी जागेवरील इमारत क्र. 'बी' व'क्लबहाऊस' या इमारतींचे बांधकामाचे रेकॉर्ड नकाशे सादर करुन भोगवटा प्रमाणपत्र अपेक्षिले आहे.

वरील परवानगी नुसार मंजुर बांधकाम नकाशांमध्ये अंशतः बदल करुन अर्जदार यांनी इमारतीचे जी.एच.नाईकनवरे, CA/88/11373 लायसेन्स आर्किटेक्ट/इंजिनिअर यांच्या देखरेखीखाली पुर्ण केले आहे. जागेवरील बांधकाम मंजुर नकाशाप्रमाणे केल्याचे वास्तुविशारद यांनी प्रमाणपत्र दिले आहे. सदरचे बांधकाम प्रचलित विकास नियंत्रण नियमवालीनुसार सर्वसाधारणपणे योग्य असल्याने खाली नमुद केलेल्या अटींवर इमारत क्र. 'बी' व 'क्लबहाऊस' या इमारतीस भोगवटा करणेस महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ च्या कलम १९३ अन्वये व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार परवानगी देण्यात येत आहे.

१) अर्जदार/सदनिकाधारक/गाळेधारक यांना उक्त इमारतींमधील सामाईक जागा उदा. रेफ्युज एरिया, सामाईक पार्किंग, टॉप टेरेस इ. बंदिस्त करता येणार नाही अथवा विकता येणार नाही. सदरचे क्षेत्र सर्व लोकांसाठी खुले ठेवणे अर्जदारांवर बंधनकारक राहिल.
अर्जदार/सदनिकाधारक यांना सदनिका लगतचा दोन मजले उंचीचा टेरेस बंदिस्त करता येणार नाही.

२) रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इ. अर्जदारांनी सदनिका वितरित करण्यापुर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरित्या विकसित करणे आवश्यक आहे.

३) बांधकाम मंजुरीच्या आदेशातील तसेच अकृषिक परवानगी आदेशातील सर्व अटी व शर्ती अर्जदार/विकासक/जमीन मालक यांचेवर बंधनकारक राहतील.

४) विषयांकित जागेतील उर्वरित इमारतीचे बांधकाम मंजुर नकाशानुसार पुर्ण करुन त्यास भोगवटा प्रमाणपत्र घेणे अर्जदार/मालक/विकासक यांचेवर बंधनकारक आहे.

५) प्रस्तुत गृहप्रकल्पाकरिता नगरपंचायतीने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा न केल्यास या गृहप्रकल्पातील सदनिका हस्तांतरणापुर्वी पिण्याच्या पाण्याची आवश्यक ती पुर्तता स्वखर्चाने करणे अर्जदार/जमीनमालक/विकासक यांचेवर बंधनकारक राहिल.

६) इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट दर पाच वर्षाने करुन घेण्याची तसेच फायर विभागाकडील अंतिम ना हरकत दाखल्यातील व पर्यावरण विभागाकडील दाखल्यातील अटींची पुर्तता करणेची जबाबदारी अर्जदार/जमीन मालक /विकासक/भोगवटाधारक/सदनिकाधारक यांची राहिल.

७) अर्जदारांनी सादर केलेली माहिती/कागदपत्रे खोटी अथवा दिशाभुल करणारी आढळल्यास देणेत आलेले भोगवटा प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

८) कोणत्याही परिस्थितीत ड्रेनेज व सांडपाणी आपल्या जागेच्या बाहेर येणार नाही याची खबरदारी घेणे बंधनकारक राहिल.

९) पर्यावरण विभागांकडील नाहरकत दाखल्यांतील तसेच फायर विभागांकडील नाहरकत दाखल्यांतील सर्व अटी अर्जदार/विकासक यांचेवर बंधनकारक असुन त्याची पुर्तता करणे बंधनकारक राहिल.

१०) अधिक्षक अभियंता,पुणे यांचेकडील दि.०८/०२/२०२०रोजीच्या लिफ्ट बाबतच्या चालविण्याच्या अनुज्ञाप्ती पत्रामधील अटींची पूर्तता करणे विकसक/भोगवटाधारक यांची राहील.

११) इमारतीस धोका निर्माण झाल्यास अथवा वित्त व जिवीतहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी जागा मालक / विकसक यांची राहील.

उपयोगात आणावयाच्या इमारतीचे वर्णन

अ.क्र.	इमारत	मंजुरीप्रमाणे	प्रत्यक्ष जागेवर	मजला	मंजुरीप्रमाणे सदनिका क्र
१	इमारत क्र .'बी'	अप्पर पार्किंग+लोअरपार्किंग+तळमजला/पहिला+११मजले	अप्पर पार्किंग+लोअर पार्किंग+तळमजला/पहिला+११मजले	तळमजला/पहिला	दुकानेः- १,२,३,४,५,६,७,८,९,१०,११ सदनिकाः- १०१,१०२,१०३,१०४,१०५,१०६
				दुसरा	२०१, २०२, २०३,२०४,२०५, २०६,२०७,२०८,२०९,२१०, २११,२१२
				तिसरा	३०१,३०२,३०३,३०४,३०५, ३०६,३०७,३०८,३०९,३१०, ३११,३१२

				चौथा	४०१,४०२,४०३,४०४,४०५, ४०६,४०७,४०८,४०९,४१०, ४११,४१२
				पाचवा	५०१,५०२,५०३,५०४,५०५, ५०६,५०७,५०८,५०९,५१०, ५११,५१२
				सहावा	६०१,६०२,६०३,६०४,६०५, ६०६,६०७,६०८,६०९,६१०, ६११,६१२
				सातवा	७०१,७०२,७०३,७०४,७०५, ७०६,७०७,७०८,७०९,७१०, ७११,७१२
				आठवा	८०१,८०२,८०३,८०४,८०५, ८०६,८०७,८०८,८०९,८१०, ८११,८१२
				नववा	९०१,९०२,९०३,९०४,९०५, ९०६,९०७,९०८,९०९,९१०, ९११,९१२
				दहावा	१००१,१००२,१००३,१००४, १००५,१००६,१००७,१००८, १००९,१०१०,१०११,१०१२
				अकरावा	११०१,११०२,११०३,११०४, ११०५,११०६,११०७,११०८, ११०९,१११०,१११११,१११२
				बारावा	१२०१,१२०२,१२०३,१२०४, १२०५,१२०६,१२०७,१२०८, १२०९,१२१०,१२११,१२१२

अ.क्र	इमारत	मंजुरीप्रमाणे	प्रत्यक्ष जागेवर	मजला
२	'क्लबहाऊस'	तळमजला + १मजला	तळमजला + १मजला	तळमजला
				पहिला

बांधकाम क्षेत्र इमारत क्र.'बी' - १०४७०.२९ चौ.मी., व क्लबहाऊस-१९८.७८ चौ.मी. असे एकुण १०६६९.०७ चौ.मी. इतके आहे.

भोगवटा प्रमाणपत्र देणेत आलेल्या बांधकामाच्या नकाशांचा (One Set Record Plan) एक संच सोबत देणेत येत आहे.

हा दाखला आज दिनांक / /२०२१ रोजी माझ्या सहीने कार्यालयीन शिक्यानिशी दिला आहे.

मुख्याधिकारी,
तळेगाव दाभाडे नगरपरिषद

जा.क्र.ननि/भा.भो.प्र.प्र./ ९७७/०२१
तळेगाव दाभाडे नगरपरिषद
नगरनियोजन व विकास विभाग
ता.मावळ जि.पुणे
दिनांक: 25 FEB 2021

प्रति,

१) नाईकनवरे बिल्डकॉन प्रा.लि. तर्फे संचालक
श्री. हेमंत दत्ताजी नाईकनवरे
पत्ता :-१२०४/०४, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे-४११००४.

२) कर विभाग, तळेगाव दाभाडे नगरपरिषद, ता.मावळ, जि.पुणे.